**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१. दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/श्रीम चव्हाण/श्रीम.पवार/ पुवि/२०२२/9298
दिनांक : 2 8 NOV 2022

प्रति,
मा शिक्षण संचालक (प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य पुणे

**विषय : एन. एम. पेटीट चॅरिटी फंड मुंबई संचलित जे. एन. पेटीट टेक्निकल हायस्कूल, २८ बंडगार्डन रोड, पुणे या शाळेस आय.सी.एस.ई. मंडळाच्या अभ्यासक्रमास संलग्न होण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत**

संदर्भ : १. मा शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र दिनांक १०.५.२०२२
२.प्र अ महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे यांचे पत्र दिनांक २२.८.२०२२
३.या कार्यालयाचे पत्र जा क्र. शिउसं/ प्राथ-२०२/१२७०९/पुवि/९६९० दिनांक १९.९.२०२२
४.या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/पुवि/१०९६९, दिनांक २१.१०.२०२२
५.या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/प्राथ-२०३/शाळा मान्यता पेटीट/११३३८/२०२२,दि.४.११.२०२२
६.प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे यांचे पत्र जा.क्र. आस्था/३८०२/२०२२-२३, दिनांक ७.११.२०२२

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सादर करणेत येते की जे.एन.पेटीट टेक्निकल हायस्कूल,२८ बंडगार्डन रोड पुणे या शाळेच्या प्राथमिकच्या वर्ग मान्यतेबाबतच्या सद्यस्थितीची नियमानुसार तपासणी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनास सादर करणेबाबत ,आपलेकडील संदर्भ क्र. १ नुसार या कार्यालयास निर्देशित केले होते.तद नंतर या कार्यालयाने प्राथमिक शिक्षण संचालनालयास प्र.अ. महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग पुणे यांचेकडील दि.२२.८.२०२२ च्या अहवालाचे अनुषंगाने संदर्भ क्र. २ व्दारे प्रस्ताव सादर केला होता.

तदनंतर या प्रकरणी संदर्भ क्र. ४ नुसार दि.३.११.२०२२ रोजी प्रस्तुत कार्यालयात सुनावणी आयोजित केली होती. उक्त सुनावणीचा निर्णय प्र.अ. महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग पुणे यांनी सदर शासन यादीचे अनुषंगाने सदर शाळा मान्यतेचे अनुषंगाने स्वयंस्पष्ट शिफारस करुन शाळेच्या मान्यतेबाबत अहवाल या कार्यालयास सादर करणेबाबत संदर्भ क्र. ५ व्दारे कळविले होते.

या कार्यालयाचे दि.३.११.२०२२ रोजीच्या सुनावणीच्या निर्णयाचे अनुषंगाने संदर्भ क्र. ६ व्दारे .प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे यांनी खालीलनुसार अहवाल सादर केला आहे.

१.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ पुणे मनपा यांनी दि.८.१२.२००९ चे पत्रान्वये सदर इ. १ ली ते ४ थी प्राथमिक शाळेबाबत मान्यता क्रमांक १४०९३ हा असून ही शाळा कार्यान्वित असलेबाबत प्रमाणपत्र दिलेले आहे.

२.मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे मुंबई, शासकीय मुद्रणालय यांनी दि.३१.३.१९७८ रोजीची दि.१६.६.१९७९ रोजी सार्वत्रिक वापरासाठी प्रसिध्द केलेल्या पुस्तकामध्ये पुणे शहरातील तालुका हवेली अंतर्गत अ.क्र. ३०५ वर शाळेची मान्यता दिसून येते आहे यामध्ये शाळा स्थापनेचा दिनांक व वर्ष १.६.१९८८ असा नमूद असून शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असून शिकवित असलेले वर्ग इ. ५ वी ते इ. १० वी असे असल्याचे आढळून येत आहे. सदर शाळा ही बीन मदतीची असल्याचे नमूद आहे.

३. शाळेने सादर केलेल्या जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचेकडील जा.क्र. ६५/९४/२००९-१० दि.२७.११.२००९ च्या वैयक्तिक मान्यता पत्रामध्ये सदर शाळा कायम विना अनुदानित (इंग्रजी माध्यम) असल्याचे नमूद आहे.

४.सदर प्राथमिक शाळेचा यु डायस क्रमांक २७२५१५००६२२ व माध्यमिक शाळेचा यु डायस क्रमांक २७२५१५००६२० असून दरवर्षी शाळेचे इंग्रजी माध्यम व व्यवस्थापन स्वयंअर्थसहाय्यित असा उल्लेख आढळून येतो.

५. सद्यस्थितीत शाळा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण राज्य मंडळ बोर्डाशी संलग्न आहे. सदर शाळेस महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा ११-१५-००९ हा सांकेतिक क्रमांक प्राप्त आहे.

प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे यांचेकडील संदर्भ क्र. ६ चे अनुषंगाने वरीलप्रमाणे एन. एम.पेटीट चॅरिटी फंड मुंबई संचलित जे. एन. पेटीट टेक्निकल हायस्कूल, २८ बंडगार्डन रोड, पुणे या शाळेस आय.सी.एस.ई. मंडळाच्या अभ्यासक्रमास संलग्न होण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्राचे अनुषंगाने स्वयंस्पष्ट अहवाल सादर करीत आहोत.

स्विकार व्हावा ही विनंती.

आपला विश्वासू

(औदुंबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहिती स्तव रवाना

१. प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे-५

२. प्राचार्य,जे.एन.पेटीट टेक्निकल हायस्कूल, २८ बंडगार्डन रोड, पुणे-१